

# -: श्री. भक्त पुंडलिक :-

वरं पुंडरिकाय दातुं मूनिंद्रैः ।

- आदिशंकराचार्य.

आदिशंकराचार्य पुंडलिकाचा उल्लेख 'मुनिंद्र' असा गौरवपूर्ण करतात. यावरून त्यांचे महानपण आपल्याला कळून येते. श्री विठ्ठलास श्रीकृष्णाचा अवतार समजले जाते. श्रीकृष्णाबद्दलची एक कथा प्रसिद्ध आहे ती अशी, की काही कारणाने रूक्मिणी रुसून द्वारकेहून दिंडीरवनात येऊन बसली. तेव्हा श्रीकृष्ण भेटायला व रुसवा काढण्यासाठी व द्वारकेला परत नेण्यासाठी दिंडीरवनात आले. तेव्हा त्यांची भेट पुंडलिकाशी झाली. असे वर्णन 'श्री हरिविजय' या ग्रंथात आहे. श्रीकृष्ण आले असता, भक्त पुंडलिक आपल्या आई वडिलांच्या सेवेत मग्न होते. प्रत्यक्ष परमात्मा श्रीकृष्ण दिसले तरीही आई वडिलांच्या सेवेत खंड पडू नये म्हणून एक विट तिकडे टाकून "त्या विटेवर तोवर उभा रहा" असे पुंडलिकाने श्रीकृष्णास सांगितले. नंतर पुंडलिक श्रीकृष्णास भेटले. मग पुंडलिकाने श्रीकृष्णास वरदान मागितले की "देवा आपण येथेच दिंडीरवनात भक्तांसाठी आपण कायम निवास करावा". तेव्हा श्रीकृष्ण म्हणाले "आता कलियुग सुरू होण्यापूर्वी माझी अवतार समाप्ती होईल. पण ह्या अवतार

समाप्ती नंतर मी, रूक्मिणी, राधा, सत्यभामेसह मूर्तीरूपाने या ठिकाणी निवास करुन दर्शन देत राहू."

आपणास पुंडलिक म्हटल्यावर आई-वडिलांची सेवा ही गोष्ट प्रकर्षाने लक्षात येते. म्हणजेच 'आई-वडिलांची सेवा ही देवापेक्षा मोठी आहे'. हीच शिकवण पुंडलिकाने समाजाला दिली व तोच आदर्श घालून दिला.

पंढरपूर येथे चंद्रभागेच्या वाळवंटात पुंडलिकाचे मंदिर आहे. पंढरपूरला येणारे प्रत्येक वारकरी, भाविक प्रथम चंद्रभागा स्नान, पुंडलिकाचे दर्शन घेऊन मगच विठ्ठलाचे दर्शन घेतात. पुंडलिक आपल्या विठ्ठलभक्तीमुळे प्रत्यक्ष देवास ही वाट पहायला लावणारा भक्त देवत्वास प्राप्त झाला. हे यावरून दिसून येते.

संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत एकनाथ, संत तुकाराम, संत चोखामेळा, संत जनाबाई हे सर्व संत आपल्या अभंगातून महात्म्य वर्णन करतात.

संत तुकाराम महाराज म्हणतात...

"सकळही संता भेटी एकवेळा । पुंडलिक डोळा देखलिया ।।"

- कु. मधुरा प्रमोद किरपेकर

व्यक्तिरेखा -

१. विठ्ठल - श्री. सुर्यकांत कुलकर्णी.
२. भक्त पुंडलिक - श्री. निनाद कुलकर्णी
३. भक्त पुंडलिक वडील - श्री. विनायक पवार.
४. भक्त पुंडलिक आई - श्रीमती. सावित्री कुलकर्णी.

नेपथ्य -

१. श्री. शंतनू देशमुख.
२. श्री. अद्वैय मुंढे.
३. श्री. गिरीश कुलकर्णी.
४. श्री. गणेश गायकवाड.
५. श्री. आशुतोष गोळे.
६. श्री. के. एन. देसाई सर.
७. श्री. महेश पुजारी.

८. श्री. सारंग चव्हाण.

लोकेशन -

श्री. गणेश गायकवाड यांचे राहते घर, गायकवाड मळा, पश्चिम सुपने, कराड

रंगभूषा -

श्री. गणेश सावंत.

वेशभूषा -

१. सौ. आसावरी पंडित.

२. श्री. गणेश सावंत.

छायाचित्रण -

श्री. कल्पेश पाटसकर.

लायटिंग विभाग -

१. श्री. गणेश गायकवाड.

२. श्री. आशुतोष गोळे.

३. श्री. सर्वेश उमराणी.

४. श्री. अद्वैय मुंढे.

५. श्री. शंतनू देशमुख.

६. श्री. महेश पुजारी.

फोटो एडिटिंग -

१. श्री. राजेंद्र बिळासकार.

चित्र (स्केच) -

१. अद्वैय मुंढे.

लेखन विभाग -

- लेखन विभाग प्रमुख - श्री. राजेंद्र आलोणे.
- लेखन - कु. माधुरी किरपेकर
- लेख संकलन -

  -श्री. दीपक आफळे.
- ध्वनीमुद्रण - सौ. स्वप्नजा बर्वे.
- ध्वनिमुद्रिका -